महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

शुक्रवार ❖०१ नोव्हेंबर २०२४ ❖वर्ष ६ ❖अंक १२९❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

## ठाणे जिल्ह्यातही नामसाधर्म्याचा 'डबलरोल'

### चार मतदारसंघात मुख्य उमेदवारांच्या नावांशी साम्य असलेले उमेदवार रिंगणात





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
अंबरनाथ(**प्रतिनिधी**) :

प्रमुख उमेदवारांच्या नावाशी साधर्म्य असलेले उमेदवार उभे करून त्यातून संभ्रम निर्माण करत मतांची फाटाफुट करण्याची खेळी गेल्या काही वर्षात सातत्याने केली जाते आहे. तसाच काहीसा प्रकार विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने बेलापूर, कल्याण पूर्व, अंबरनाथ आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघात झाल्याचे दिसून आले आहे. बेलापूरमध्ये संदिप नाईक, मंदा म्हात्रे, मुरबाड विधानसभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार सुभाष पवार यांच्या आणि अंबरनाथ विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार राजेश वानखेडे यांच्या नावाशी साधर्म्य असलेले उमेदवार रिंगणात आहेत. कल्याण पूर्वेत महेश गायकवाड या नावाचेही दोन उमेदवार रिंगणात आहेत. नामसाध्यर्म असलेले उमेदवार उभे करून एखाद्या उमेदवाराला पाडण्याचा प्रकार यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमध्ये झाला आहे. मतांची विभागणी झाल्याने उमेदवार पराभूत झाल्याचेही प्रकार यापूर्वी समोर आले आहेत. मात्र ही खेळी सातत्याने केली जात असल्याने यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमधून दिसून आली आहे. यंदाच्या निवडणुकीतही ठाणे जिल्ह्यात चार मतदारसंघात नावात साम्य असलेले उमेदवार दिसून आले आहेत. विशेष म्हणजे चारही मतदारसंघात चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. यात भाजपाला रामराम ठोकत उमेदवारीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षात गेलेल संदिप गणेश नाईक यांच्या नावाशी साधर्म्य असलेले संदिप प्रकाश नाईक बेलापूरमध्ये अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. तर भाजपच्या अधिकृत उमेदवार मंदा विजय म्हात्रे यांच्या नावाशी साम्य असलेल्या मंदा संजय म्हात्रे या अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. त्यामुळे एकमेकांच्या विरोधात नामसाधर्म्य असलेले उमेदवार उभे करून मतांची विभागणी करण्याची ही रणनिती असल्याची चर्चा रंगली आहे.

दुसरीकडे मुरबाड विधानसभा मतदारसंघात सध्या चुरशीची लढत आहे. येथे विद्यमान आमदार किसन कथोरे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे सुभाष पवार यांचे आव्हान आहे. कथोरे यांना स्वपक्षियांशीही लढण्याची वेळ सध्या आली आहे. भाजप आणि महायुतीतील नाराजांचा सामना त्यांना करावा लागणार आहे. मात्र सुभाष गोटीराम पवार यांच्या नावाशी साम्य असलेले सुभाष शांताराम पवार यांनीही अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. त्यामुळे पवार यांच्या मतांना विभागण्याची ही खेळी चर्चेचा विषय बनली आहे. तर शेजारच्या अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातून रिंगणात असलेले राजेश देवेंद्र वानखेडे यांच्या नावाशी साम्य असलेले राजेश अभिमन्यू वानखेडे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. राजेश वानखेडे हे अंबरनाथचे विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्याविरूद्ध रिंगणात उतरले आहेत. २०१४ च्या निवडणुकीत वानखेडे अवघ्या काही मतांनी पराभूत झाले होते. त्यामुळे नावात साम्य असलेले अपक्ष उमेदवार उभे करून वानखेडेंची मते विभागण्याची ही खेळी असल्याचे बोलले जाते.

## महाराष्ट्रात होणार राजकीय भूकंप!

### – देवेंद्र फडणवीस



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
मुंबई(**प्रतिनिधी**) :

मुंबई महापालिकेत लक्षवेधी काम करणारे करणारे नेते रवी राजा यांनी कॉंग्रेसला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केला. आज देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. निवडणूक काळात रवी राजा यांच्यावर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.

मुंबईचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची घोषणा करण्यात आली आहे. त्यांच्या पक्षप्रवेशानंतर झालेल्या भाजपच्या पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस यांनी बड्या राजकीय भुकंपाचे संकेत दिलेत. काही चांगले पक्षप्रवेश हे भाजपमध्ये होऊ शकतात. तुम्ही त्याची वाट पाहा. आज मला विचारू नका. असे फटाके सुरू राहतील. रवी राजांच्या संपर्कात अनेक लोक आहेत. त्यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. येणाऱ्या काळात ते आमच्यासोबत येतील, असं देवेंद्र फडणवीस म्हणालेत.

**रवी राजांच्या पक्षप्रवेशावर काय म्हणाले?**

रवी राजा यांच्यासारखा मातब्बर नेता, ज्यांनी पालिका गाजवली, मावळत्या महापालिकेचे विरोधी पक्षनेते होते. आक्रमक भूमिका मांडणारे नेते. पाच टर्म महापालिकेत निवडून आले. एक विक्रम त्यांच्या नावाने आहे, २३ वर्ष त्यांनी बेस्टचे सदस्य म्हणून काम केलं. बेस्ट संदर्भात पालिकेत रवी राजा यांच्याकडे ऑथेरिटी म्हणून बघितलं जातं. जनसंपर्क असलेला नेता. कॉंग्रेस नेत्यांशी त्यांचा कनेक्ट आहे. आम्हाला रवी राजा यांचा फायदा होईल, असा विश्वास फडणवीसांनी व्यक्त केला.

रवी राजा यांच्या अनुभवाचा फायदा भाजपला मिळेल. त्यांच्या माध्यमातून आमच्या संपर्कात अनेक लोक येत आहे. पुढच्या काळात कॉंग्रेसचे प्रमुख लोक त्यांच्या संपर्कातून भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. ही नावे आज विचारू नका. प्रवेश होईल तेव्हाच सांगेल. पालिकेत आणि मुंबई शहरात ज्यांनी कॉंग्रेस टिकवून ठेवली त्यापैकी रवी राजा आहे. रवी राजा यांचं कार्यक्षेत्र मोठं आहे. सायनमध्ये त्यांचं काम मोठं आहे. त्यामुळे आमचे उमेदवार तमिल सेल्वन यांना फायदाच होणार आहे, असं देवेंद्र फडणवीस या पत्रकार परिषदेत म्हणाले.

**महायुतीचं सरकार येणार- फडणवीस**

जनतेच्या मनात विश्वास होत आहे. महायुतीचं सरकार येणार आहे. लोकांमध्ये सकारात्मकता दिसून येत आहे. नामांकन पूर्ण झाले आहे. काही ठिकाणी आमचे क्रॉस फॉर्म आले होते. त्याबाबत शिंदे यांच्या घरी बैठक झाली. अजितदादा, बावनकुळे, तटकरे आणि प्रफुल्ल पटेल होते. आम्ही सर्व इश्यू संपवले आहेत. ते इश्यू शिल्लक नाही. त्याचं प्रत्यंतर दिसेल. सर्व अर्ज मागे घेतले जातील. काही ठिकाणी एकमेकांच्या उमदेवारासमोर लोकं उभे आहेत. त्याबाबतही नीती तयार केली आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं आहे.

ज्यांनी तिकीट नसताना उमेदवारी भरली त्यांना अर्ज मागे घेण्यास लावणार आहे. पक्षांतर्गतही बंडखोरी झाली. त्यांना विश्वासात घेऊन त्यांनाही अर्ज मागे घ्यायला लावू. आमचे सर्व अर्ज वैध झाले आहे. दिवाळी दोन दिवस आहे. साधारण ४ ते ५ तारखेने जोराने प्रचार सुरू होईल, असं फडणवीस म्हणाले.

## दिवाळी पहाटला राजकीय कलगी तुरा



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

दिवाळी पहाटचा मुहूर्त साधून ठाणे कल्याण डोंबिवलीत आज सर्वच पक्षांच्या नेत्यांनी एका प्रकारे प्रचाराचा नारळ फोडला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात तलावपाळी येथे उपस्थित राहत 'मला पुन्हा साथ द्या' असा नारा दिला. तर डोंबिवलीत ढोलताशांची जागा 'डिजे' ने घेतल्याने तेथे ही राजकीय कलगीतुरा रंगलेला पाहायला मिळाला.

ठाणे डोंबिवलीत दिवाळी पहाट, गुढीपाडव्याचे नवे वर्ष मोठ्या उत्साहात साजरी करण्याची जुनी परंपरा आहे. शेकडोंच्या संख्येने युवक युवती पहाटेपासून राम मारूती रोड, फडके रोड, तलावपाळी येथे जमतात आणि उत्साहात दिवाळ सण साजरा करतात. दरवर्षी वाढत असलेला युवकांचा प्रतिसाद लक्षात घेता गेल्या काही वर्षांपासून या उत्सवांचे राजकीयकरण होताना पाहायला मिळत आहे. डोंबिवलीत पाडवा, पहाट उत्सवांना सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, खासदार श्रीकांत शिंदे यांनी कधीच आपल्या कवेत घेतले असून येथील कार्यक्रमांच्या आयोजनात ही मंडळी पुढे दिसू लागली आहेत. यंदा विधानसभा निवडणुकींच्या धामधुमीत दिवाळी पहाट उगवल्याने राजकीय नेत्यांनी यानिमित्ताने प्रचाराचा बार उडवून दिल्याचे गुरुवारी पाहायला मिळाले.

**सर्वच पक्षांची 'फटाके'बाजी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या दोन दिवसांपासून ठाण्यात तळ ठोकला असून मंगळवारी रात्री त्यांनी कोपरी येथे दिवाळी संध्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवत प्रचाराचे निमित्त साधले. गुरुवारी सकाळपासूनच ते ठाण्याच्या तलावपाळी येथे उपस्थित राहिले. याच दरम्यान त्यांनी तीन हात नाकाजवळील रहेजा संकुल, पुढे तलावपाळी, त्यानंतर गोखले मिसळ आणि चहाचेही झुरके घेतले. या काळात त्यांनी 'मला साथ द्या, मी तुमच्यासाठी योजना राबवेल' असे आवाहनही युवकांना केले. मुख्यमंत्री शिंदे एकीकडे ठाण्याची पायधुळ झाडत असताना शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे राजन विचारे यांनी जुन्या ठाण्यातील मुस चौकात दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करत तरुण ठाणेकर मतदारांना साद घालण्याचा प्रयत्न केला. राजन विचारे यांच्या कार्यक्रमात वेगवेगळी प्रचार गीते सातत्याने वाजवत पद्धतशीर प्रचार केला जात होता. मनसेचे अविनाश जाधव यांनी राम मारूती रोड येथे आयोजित केलेला असाच कार्यक्रम युवक युवकांसाठी आकर्षण ठरला. भाजपचे उमेदवार संजय केळकर यांनी स्वतः कोणताही कार्यक्रम आयोजित केला नाही, मात्र नौपाडा आणि जुन्या ठाण्यातील एकही दिवाळ पहाट कार्यक्रम त्यांनी चुकवला नाही.

## पनवेल तालुक्यातील नैना प्रकल्पाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध

### प्रकल्प अधिकाऱ्यांच्या विरोधात शेतकरी आक्रमक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
पनवेल(**प्रतिनिधी**) :

नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना प्रकल्प) ४० गावांमध्ये सिडको महामंडळ रस्त्यांच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या कामांचे ठेके सुद्धा सिडको मंडळाने विविध ठेकेदारांना वाटप केले. नैना स्थापनेनंतर ११ वर्षांनी पहिल्यांदा नैना प्रकल्पात रस्ते व इतर पायाभूत सुविधांचे काम सूरु करण्यासाठी सिडको मंडळाने कंबर कसली असल्याने बुधवारी दुपारी देवद गावामध्ये या कामांची सूरुवात करण्यासाठी ठेकेदार कंपनीचे दोन अधिकारी गावात दाखल झाल्यानंतर अधिका-यांना ग्रामस्थांच्या रोषाचा सामना करावा लागला. जोपर्यंत शेतक-यांचे प्रश्न सिडको मंडळ सोडवत नाही, तोपर्यंत नैना प्रकल्पाचे एकही काम सूरु होऊ देणार नाही.

असा पवित्रा संतप्त शेतक-यांनी घेतल्याने ठेकेदार कंपनीच्या अधिका-यांना काम न करता परतावे लागले. विधानसभा निवडणूकांच्या प्रचारात नैना प्रकल्पाला शेतक-यांकडून तीव्र विरोध होत आहे. देवद गावात भाजपच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी आक्रमक भूमिका घेतल्याने काही वेळेसाठी तणावाचे वातावरण पसरले होते. या सर्व स्थितीमुळे नैना प्रकल्पाचे काम रखडण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. . ११ वर्षांपासून रखडलेल्या नैना प्रकल्पामधील रस्ते, मलनिसारण वाहिनी व इतर बांधकामे सूरु करण्यासाठी सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय



सिंघल हे आग्रही आहेत. त्यामुळे साडेचार हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचे ठेके सिडको मंडळाने विविध कंपन्यांना दिले. यामधील सर्वात मोठा ठेका २,३६२ एल. ॲण्ड टी कंपनीला सिडकोने दिला आहे. तसेच शेकापचे उद्योजक जे. एम. म्हात्रे यांच्या मालकीच्या जे.एम. म्हत्रे इन्फ्रा. आणि आ. प्रशांत ठाकूर यांच्याशी निगडीत असणा-या टीआयपीएल कंपनीला याच कामातील काही ठेके सिडकोने दिले होते. मात्र भाजपचे आ. ठाकूर यांनी जोपर्यंत नैना प्रकल्पातील शेतक-यांचे प्रश्न सुटत नाही तोपर्यंत नैना प्रकल्पाची कामे सूरु करणार नाही अशी भूमिका घेतल्यामुळे सिडकोच्या अडचणी वाढल्या आहेत.

आ. ठाकूरांच्या भूमिकेनंतर भाजपचे पनवेलच्या गावागावांमधील कार्यकर्ते नैना विरोधी लढ्यात प्रत्यक्ष उतरले आहेत. बुधवारी दुपारी देवद ग्रामपंचायतीमध्ये एल. ॲण्ड टी कंपनीचे दोन अधिकारी काम सूरु करण्याची माहिती देण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये आल्यावर ग्रामपंचायतीमध्ये परिसरातील ग्रामस्थ जमा झाले. या परिसरातील रायगड जिल्हापरिषदेचे भाजपचे माजी सदस्य अमित जाधव यांनी लोकसत्तेला दिलेल्या माहितीनूसार एल. ॲण्ड टी कंपनीचे अधिकारी कामाची पूर्वतयारी आणि देवद गावातील सर्वे क्रमांक ७०/ अ या प्रत्यक्ष ठिकाणच्या पाहणीसाठी आल्याचे या दोन अधिका-यांनी सांगीतल्यावर ग्रामस्थ संतापले. जोपर्यंत ग्रामस्थांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत. तोपर्यंत नैनाची एकही वीट ग्रामस्थ लावू देणार नाही असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला. देवद ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद वाघमारे, विजय वाघमारे, निलेश वाघमारे, संदेश वाघमारे, अविनाश गायकवाड, वासूदेव भिंगारकर यांनी विरोध केला. ही बातमी ग्रामस्थांमध्ये पसरल्यानंतर पाली व विचुंबे येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी देवद ग्रामपंचायतीकडे धाव घेऊन नैनाच्या प्रकल्पाच्या सूरु होणा-या कामाला विरोध केला. याबाबत सिडको मंडळाच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांच्याशी संपर्क साधला मात्र संपर्क होऊ शकला नाही.

## प्राध्यापकांची निवडणुकीच्या कामांतून मुक्तता

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
मुंबई(**प्रतिनिधी**) :

एका खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांची निवडणुकीच्या कामातून पूर्णपणे मुक्तता करण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला. मात्र, परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकानुसार व्हाव्यात यासाठी काही प्राध्यापकांना निवडणुकीच्या कामातून सूट दिली.

महाविद्यालयातील १८९ पैकी १२४ प्राध्यापकांना निवडणुकीची कामे देण्यात येतील आणि उर्वरित प्राध्यापक परीक्षा घेऊ शकतील. तसेच निवडणूक आयोगाच्या प्रशिक्षणाला हजेरी न लावणाऱ्या प्राध्यापकांवर कारवाई केली जाणार नाही, असे आश्वासन निवडणूक आयोगातर्फे न्यायालयात देण्यात आले.

खासगी महाविद्यालय असल्याने त्यास लोकप्रतिनिधी कायद्याचे कलम १५९ लागू होत नाही. तरीही जिल्हा निवडणूक अधिकारी छळवणूक करीत आहेत.

निवडणुकीचे काम न केल्यास आयोग कारवाई करेल. त्यामुळे त्यापासून संरक्षण द्यावे, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.



# दिपावलीची अपूर्वाई

लीना बल्लाळ; ठाणे

**भुई नळयांचे झाड फुलांचे**
**भिडे निळया आभाळी रे**
**आली उधळत हासत फुलवित**
**लक्षदीप दिपवाली रे**

सर्व सणांचा राजा असणारा दिवाळी या नावातच आनंद आहे उत्साह आहे शरद ऋतुतील चैतन्यमय वातावरण घेऊन येणारी दिवाळीचे वेध दसऱ्यापासूनच लागतात दीपावली हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ दिव्यांची रांग किंवा दिव्यांच्या ओळी असा आहे

पहाटेच्या वेळची सुंदरता वाढवीत तसाच तो प्रकाशाचे तेच घेऊन येणारा हिंदू सण आहे इतर रुपात इतर भारतीय धर्मांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला ओळखले जाते आपल्या जीवनातून गडद सावल्या नकारात्मकता आणि शंकांचे निर्मूलन चिन्हांकित करत असते हा सण प्रकाशाचे तेज आणि सकारात्मकतेने आपल्या गाभ्यातील देवाण घेवाण प्रकाशित करण्याचा संदेश देतो.

दिवाळीचे दिवस म्हणजे नातेवाईकांच्या भेटीगाठी भेट वस्तूंची दिवाण घेवान नव नवीन कपड्यांची आणि आधुनिक फटाक्यांची खरेदी अशी रेलचेल घेऊन येणारा असतो घरोघरी फराळांचा घमघमाट सुटलेला असतो मिठाई आणून सर्वांना वाटून दिवाळी गोड केली जाते दिवाळी हा असा एकमेव सण आहे की तो लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांना आनंदाचा दिवस असतो घरासमोर शुभसूचक रांगोळया काढल्या जातात वाईट प्रवृत्तींना दूर पाठवून देणारा, चमकणारा सर्वांचं लक्ष वेधून घेणारा आकाश कंदील तसेच अंधार दूर करून पहाटेच्या वेळची सुंदरता वाढवणाऱ्या पणत्यांची रांग पाहून मन प्रसन्न होते.

हा सण साधारणपणे चार ते पाच दिवस साजरा केला जातो दिवाळी विविध धार्मिक कार्यक्रम आणि व्यक्तिमत्वाशी जोडली गेलेली आहे. इतर प्रादेशिक परंपरा या सणाला विष्णू कृष्ण शिवकाली हनुमान कुबेर धन्वंतरी यांच्याशी जोडतात प्रामुख्याने हिंदू सण असला तरी ही दिवाळी विविध प्रकारे इतर धर्मांचे देखील लोक साजरी करतात. जैन लोक त्यांची स्वतःची दिवाळी पाळतात जी महावीरांच्या अंतिम मुक्तीचे प्रतीक आहे मुघल तुरुंगातून गुरु हरगोविंद यांची सुटका झाल्याबद्दल शिख लोक दिवाळी साजरी करतात. नेवार बौद्ध हे इतर बौद्धांच्या विपरीत लक्ष्मीची पूजा करून दिवाळी साजरी करतात बांगलादेशातील हिंदू सामान्यतः देवी काली मातेची पूजा करतात लोक त्यांची घरे मंदिरे कार्यस्थळे दिव्यांनी प्रकाशित करतात दिवाळीची पहाट ही संगीताची मैफलने मनोरंजन किंवा नृत्याचे सादरीकरण अशा विविध कार्यक्रमांनी केली जाते हा दिवस बिझी,गयाना, मलेशिया, सिंगापूर, श्रीलंका, क्रिमीनाद आणि टोबॅगो येथे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो दिवाळीत किल्ल्यांची प्रतिकृती करून इतिहासाची साक्ष दिली जाते युवा पिढीने किल्ल्यांचे रक्षण करणे हा यामागील हेतू असतो. घरोघरी सगळीकडे साजरा होणारा दिवाळीतील महत्त्वाचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन.

दीपावली हा सण दोन युगांशी म्हणजेच सत्ययुग आणि त्रेतायुगाशी जोडला आहे सत्ययुगात समुद्रमंथनातून माता लक्ष्मी या दिवशी प्रकट झाली होती भगवान श्री राम सुद्धा त्रेता युगात याच दिवशी आयोध्येला पोहोचले होते त्यावेळी आयोध्या वासियांनी लक्षावधी दीप प्रज्वलित करून आपल्या भगवंताचे स्वागत केले. लक्ष्मीपूजन हे सत्ययुगाशी संबंधित आहे. दुसरा दीपावली हे ते त्या युगाशी संबंधित प्रभू रामचंद्र व दिव्यांची आरास दीपावली साजरी होते.

आजकालच्या धाकधुकीच्या जीवनात बरेचदा या सणाचा आनंद घेण्यासाठी पर्यटन स्थळाला भेट देतात आणि नवा उत्साह घेऊनच परततात. ठाण्यात तरुण मंडळी तलाव पाळी येथे एकत्र जमतात फटाक्यांच्या जल्लोषात दिवाळी साजरी करतात. राम मारुती येथे तरुणाईची दिवाळी आगळीवेगळी फटाक्यांच्या आतिषबाजीने साजरी होताना पाहायला मिळते तसेच तलाव पाळीवरील दिव्यांची मनमोहक रोषणाई डोळयांचे पारणे फेडणारी असते वाचन प्रेमींना तर दिवाळीची खास मेजवानी म्हणजे दिवाळी अंकांचा आनंद भरभरून घेता येतो

**घरोघरी दिसे दिवे दिव्यांची रोषणाई**
**अनुभवूया सगळे दिवाळीची अपूर्वाई**

ही दिवाळी तुम्हा सर्वांना सुख समृद्धी आनंद, चैतन्य आणि भरभराटीची जावो ही शुभेच्छा

# स्वामी विवेकानंद संस्थेचे राष्ट्रीय कार्यातील योगदान



स्वामी विवेकानंद या संस्थेची स्थापना १९९७ साली मौजे पाली, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे (महाराष्ट्र) येथे संस्थापक अध्यक्ष श्री सुनील मारुती म्हसकर आणि त्यांचे सहकारी यांनी केली. 'निस्वार्थवृत्तीने राष्ट्रसेवा व जनसेवा' हे ब्रीद लक्षात घेऊन संस्था आजतागायत राष्ट्रविकासाचे व जनसेवेचे महान कार्य करत आहे. स्वामी विवेकानंद संस्थेने मागील २७ वर्षांपासून आजतागायत राष्ट्रीय कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. संस्थेने जानेवारी २०२२ला रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केल्याचा सर्वांना सार्थ अभिमान व आनंद वाटत आहे.

**'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य-वरान्निबोधत!'**

'उठा, जागे व्हा, ध्येयसिद्धी झाल्याखेरीज थांबू नका!' हा स्वामी विवेकानंद यांचा संदेश आणि ओले मूळ भेदी खडकाचे अंग; अभ्यासाशी संग कार्यसिद्धी!

ही जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची शिकवण लक्षात घेऊन, तसेच 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा', हा मंत्र उराशी बाळगून निस्वार्थपणे व सेवाभावी वृत्तीने शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, आरोग्य, विज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, पर्यावरण संरक्षण व संवर्धन आदी क्षेत्रामध्ये संस्था उल्लेखनीय कार्य करून समाजविकास व राष्ट्रनिर्माण या कार्यात आपला खारीचा वाटा उचलत आहे. त्यासाठी संस्था वेळोवेळी अनेक कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा व शिबीर राबवत असते.

संस्था भारत सरकारच्या युवाकार्य व क्रीडा मंत्रालयाच्या नेहरू युवा केंद्र ठाणे यांच्याशी सन २००३ पासून संलग्न राहून भारत सरकारच्या युवाविकास व क्रीडाविकास संबंधित शासकीय योजना व राष्ट्रीय उपक्रम यशस्वीपणे पार पाडून व खेड्यापाड्यांत व आदिवासी भागात तळागाळातील लोकांपर्यंत योजना व उपक्रम पोहोचवून संस्था राष्ट्रीय विकासात योगदान देत आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी, ग्रामीण तसेच डोंगराळ व दुर्गम भागातील अन्यायग्रस्त, पीडित, दुर्बळ तसेच इतर घटकांच्याही अनेक समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संस्था सदैव प्रामाणिकपणे प्रयत्न करत असते. स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळावा म्हणून संस्था सदैव तत्पर असते.

युवक-युवती व बालक-बालिका यांस देशाचे सुशिक्षित, सुसंस्कारित, विविध कलागुणसंपन्न व विविध कौशल्यात निपुण असे उत्तम व चारित्र्यवान, सक्षम नागरिक घडविण्यासाठी संस्था विशेष प्रयत्नशील असते. भाषा व संस्कृती, संस्कार व शिस्त, व्यसनाधीनता व बेकारी, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन, व्यायाम व ताण-तणाव, पर्यावरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन अशा अनेक विषयांवर व्याख्याने, कार्यशाळा व मार्गदर्शनवर्ग याद्वारे युवकांना आणि समाजातील इतर घटकांना यशस्वी जीवनाचे तंत्र व मंत्र देण्यासाठी संस्था नेहमीच पुढाकार घेत असते.

भारतीय स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन हे राष्ट्रीय सण; शिवजयंती, श्रीरामनवमी व दहीहंडी असे उत्सव; महाराष्ट्र दिन व कामगार दिन, आंतरराष्ट्रीय युवा दिन, बाल दिन व बालिका दिन, जागतिक पर्यावरण दिन, जागतिक महिला दिन, राष्ट्रीय एकात्मता दिन, साक्षरता दिन व विज्ञान दिन असे अनेक दिनविशेष आणि महान पुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी अशा प्रसंगी संस्था विविध नाविन्यपूर्ण व समाजोपयोगी उपक्रम राबवत असते. संस्थेने आजतागायत अनेक प्रकारची समाजोपयोगी शिबिर आयोजित केली आहेत. उदा.- युवा विकास आणि व्यवसाय व रोजगार मार्गदर्शन शिबिर, महिला मंडळ व महिला बचतगट मार्गदर्शन शिबिर, गड व किल्ले साहस शिबिर, युवा श्रमसंस्कार शिबीर, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यानमाला, आरोग्य तपासणी शिबिर, अंधश्रद्धा निर्मुलन व जनजागृती शिबिर, व्यसनमुक्ती, एड्स व कॅन्सर जनजागृती शिबिर इत्यादी. तसेच संस्थेने अनेक शिबिर तसेच शासकीय मोहिमा व अभियानात सहभाग घेतला आहे. उदा. माहिती अधिकार जनजागृती शिबिर, झाडे लावा, झाडे जगवा आणि पाणी अडवा, पाणी जिरवा अभियान, सेंद्रिय भात शेती उत्पादन व पद्धतीवर आयोजित शिबिर इत्यादी. संस्था गड व किल्ले स्वच्छता अभियान, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचे महत्त्व कृतीतून दाखवून देते. जिल्हास्तरीय पथनाट्य स्पर्धा, पारंपारिक लोकनृत्य व वेशभूषा स्पर्धा, वक्तृत्व, निबंधलेखन स्पर्धा,. सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून युवक व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत असते. कुस्ती, कबड्डी व क्रिकेट स्पर्धा, धावणे आदी क्रीडा स्पर्धा व क्रीडा महोत्सव आयोजित करून देशी व विदेशी खेळांना प्रोत्साहन देत असून त्याद्वारे अनेक खेळाडू घडविले जात आहेत. हळदी कुंकू समारंभ सारखे महिलांविषयक कार्यक्रम आयोजित करून त्याद्वारे महिलांना सन्मान देण्याचा प्रयत्न करत असते. त्याशिवाय संस्था समाजातील गुणवंत व आदर्शवान, कलाकार व्यक्ती यांचा सत्कार सोहळा व गुणगौरव सोहळा आयोजित त्याद्वारे त्यांच्या कलागुणांना वाव देत असते. संस्कार केंद्र चालवणे, युवा व्यक्तिमत्व विकास वर्ग भरविणे, दहावीसाठी मोफत विनामूल्य मार्गदर्शन तासिकांचे आयोजन करणे, महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक वाचनालय याद्वारे वाचन चळवळीचा विकास करणे, व्यवसाय व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करणे असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम संस्था वेळोवेळी राबवत आहे.

राष्ट्रीय आपत्तीच्या काळात तसेच देशाला संकटाच्या काळी मदतीचा हात देऊन खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न संस्थेने अनेक वेळा केलेला आहे. २००५च्या महापुराच्या काळात अन्नदान व जलदान करून पुरात अडकलेल्या लोकांना मदतीचा हात दिला आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर अनेक गरजू दुर्बळ घटकांना, आदिवासी लोकांना कपडे व अन्नधान्य वाटप तसेच गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यातून संस्था सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असते.

भारत सरकार आयोजित 'राष्ट्रीय एकात्मता शिबिर' NIC या राष्ट्रीय उपक्रमात तीन वेळा संस्थेला महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे. त्याद्वारे संस्थेने ठाणे जिल्ह्यातील अनेक युवक-युवतींना राष्ट्रीय पातळीवर आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. संस्थेच्या स्तुत्य उपक्रम कार्यक्रम व स्पर्धांचा तसेच राष्ट्रीय कार्यातील योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने नेहरू युवा केंद्र द्वारे २००४ साली दिल्ली येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय युवा संमेलनास महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर सर यांची निवड केली होती, हे अभिमानस्पद व कौतुकास्पद आहे.

तसेच संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर सर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संस्थेने केलेले कार्य लक्षात घेऊन थोर समाजसेविका मेधा पाटकर यांच्या शुभहस्ते त्यांचा गौरव करण्यात आला, हे संस्थेसाठी अभिमानास्पद आहे.

संस्थेचे सामाजिक व राष्ट्रीय योगदान लक्षात घेता संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यांस भारत सरकार युवा कार्य व क्रीडा मंत्रालय यांच्या नेहरू युवा केंद्र ठाणे तर्फे २००५ साली ठाणे जिल्हा आदर्श युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, ही बाब संस्थेसाठी भूषणावह आहे.

संस्थेच्या माध्यमातून अनेक नाविन्यपूर्ण व कल्पक असे उपक्रम राबविण्यात आल्याने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांस आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानाचा समजला जाणारा 'ग्लोबल टीचर अवॉर्ड' या आदर्श शिक्षक पुरस्काराने २०२० साली गौरविण्यात आले आहे. तसेच २०२१ साली कोकण शिक्षण आघाडीतर्फे महाराष्ट्रातील गुणवंत व सेवाव्रती व्यक्तीला दिल्या जाणाऱ्या 'विशेष सन्मान २०२१' या पुरस्काराने त्यांस भारत सरकार, पंचायत राज राज्य मंत्री कपिल पाटील साहेब यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. तर नुकताच त्यांस मुंबई तरुण भारत या लोकप्रिय वर्तमानपत्राद्वारे दिला जाणारा 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार, २०२२' ने सन्मानित करण्यात आले आहे. आजतागायत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांस जिल्हा व राज्यस्तरीय आणि जागतिक पातळीवरील २०० हून अधिक पुरस्कार, सन्मान व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात व सन्मानित करण्यात आले आहे. तसेच संस्थेचे सचिव श्री संजय बुधा तरणे यांस देखील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. संस्थेचे उल्लेखनीय कार्य पाहता स्वामी विवेकानंद संस्थेला अनेक नामांकित संस्थांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. नुकताच जानेवारी २०२४ ला संस्थेचे पदाधिकारी श्री.शैलेश पंडित तरणे यांस महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे देण्यात येणारा ठाणे जिल्हा युवा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, सन २०२१ पासून मौजे पाली येथे जिंदाल कंपनीच्या उद्योग विस्तारासाठी महाराष्ट्र शासनाकडून जे भूसंपादन सुरू केले होते, त्यास संस्था मागील ३ वर्षांपासून संविधानिक मार्गाने प्रखर विरोध करत आहे... जिंदाल कंपनीचा सदर प्रकल्प लेखी स्वरूपात ३ हजार कोटी रुपये किंमतीचा म्हणजे किमान १० हजार कोटीचा आहे. सदर भूसंपादन प्रक्रिया थांबविण्यासाठी वा शासनाचे भूसंपादन याबाबतचे आदेश आणि अधिसूचना रद्द करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर सर आणि संस्था सचिव संजय तरणे सर यांच्या मार्गदर्शन व पुढाकाराने आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि मौजे पाली गावातील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील शेतकरी यांच्या सहकार्याने पाली गावाच्या अस्तित्वासाठी संस्था सविनय आणि संविधानिक मार्गाने सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मागील तीन वर्ष कंपनीने सर्वोतोपरी प्रयत्न करूनही गेली ३ वर्षे सदर प्रकल्प थांबविण्यात संस्थेला किमान यश मिळाले आहे, यात आनंद वाटतो. संस्थेच्या अशा अनेक नाविन्यपूर्ण व कल्पक कार्यक्रम, स्पर्धा, उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी अनेकांची मदत मिळाली आहे. संस्थेचे सर्व आजी व माजी पदाधिकारी, मित्रपरिवार, गुरुजनवर्ग; समाजातील विचारवंत व प्रतिभावंत, शेतकरी मित्र, पत्रकार, साहित्यिक, डॉक्टर, अधिकारी वर्ग, समाजसेवक यांचे मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन तसेच मौजे पाली ग्रामस्थांची साथ लाभल्यामुळे संस्था मागील २७ वर्षांपासून राष्ट्रीय कार्यात भरीव स्वरूपाचे योगदान देण्याचा प्रयत्न करत आहे.

भविष्यात समाज व राष्ट्राच्या प्रगती व उन्नतीसाठी; देशाचे सुजाण, समर्थ व सक्षम नागरिक घडविण्यासाठी, त्यांचा विकास साधण्यासाठी, अन्यायग्रस्त व पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच संस्थेचा वटवृक्ष विकसित होण्यासाठी अनेकांचे मदतीचे हात व सहकार्याची साथ, मार्गदर्शन संस्थेला मिळेल आणि संस्था राष्ट्रीय कार्यात मोलाचे योगदान यापुढेही देतच राहील, हा आशावाद बाळगतो. धन्यवाद !

**- सुनील मारुती म्हसकर**
**(संस्थापक अध्यक्ष : स्वामी विवेकानंद संस्था पाली, शहापूर)**
**संपर्क :- ९०२९३०२१११**

# स्वावलंबनाची केरसुणी!



दिवाळीत फराळ, कंदील, फटाके, रांगोळी याबरोबरच केरसुणीला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्याच्या छोट्याशा सावळी गावात राहणाऱ्या सावित्री गंगाराम आरोटे यांनी स्वतः हाताने बनवलेल्या केरसुणी ठाण्यात विक्रीसाठी उपलब्ध केली आहे. गेली ४० वर्षे आरोटे यांनी केरसुणी विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून आपल्या संसाराला हातभार लावला आहे.

मुळच्या मुंबईच्या असलेल्या सावित्री यांना त्यांच्या वडिलांची शेती असल्यामुळे शेतीची कामे येत असत. पुढे गंगाराम आरोटे यांच्याशी लवकर विवाह झाल्यानंतर त्या सावळी या गावात स्थायिक झाल्या. मराठवाड्यातील सावळी गाव दुष्काळी पट्ट्यात येत. सावित्री यांच्या सासरी देखील शेती आहे त्यातून वर्षातून दोन वेळा उत्पन्न मिळते.

अन्य वेळी हाताला विशेष काम नसते. त्यावेळी हाती असलेला वेळ सत्कारणी लावण्यासाठी तसेच आर्थिक स्वावलंबनासाठी आरोटे यांच्या घरातील वडीलधारी महिला झाडू (केरसुणी) बनवत. ती कला सावित्री यांनी देखील आत्मसात केली. सावित्री या आपले पती गंगाराम यांच्या मदतीने झाडू, केरसुणी बनवण्यात तरबेज झाल्या. दोघे बनवलेले झाडू (केरसुणी) तालुक्यातील जवळपासच्या गावात विकू लागले. त्यांच्या गावात त्याला चांगली ख्याती मिळाली अनेक लोक घरी येऊन झाडू नेऊ लागले.

घरोघरी जाऊन होणाऱ्या या झाडू विक्रीला चांगली मागणी वाढल्याने आरोटे यांना रोजगार मिळू लागला. कालांतराने मुंबईत नोकरीच्या शोधात आलेल्या गंगाराम आरोटे यांनी छोटी मोठी कष्टाची कामे केली. त्यानंतर त्यांना एका बड्या कंपनीत काही काळ नोकरी मिळाली. तिथून निवृत्त झाल्यावर आरोटे दाम्पत्य पुन्हा गावी स्थायिक झाले. दरम्यानच्या काळात सावित्री या झाडू बांधून गावाला आणि मुंबईत विक्री करत राहिल्या. त्यातून कुटुंबाला तर मदत झाली. मुलींची शिक्षण पूर्ण करण्यात साहाय्य झाले. लॉकडाऊनच्या काळात देखील आरोटे कुटुंबाला या केरसुणी विक्रीतून उत्पन्न मिळत राहिले. आज त्यांच्या आठ मुली शिक्षित असून स्वतः च्या पायावर उभ्या आहेत. तरी देखील सावित्री आरोटे यांनी आपला वेळ जावा, हाताला काम असावे यासाठी अद्याप आपले केरसुणी विक्रीचे काम सुरू ठेवले आहे. सध्या त्यांनी दिवाळीसाठी लागणारे केरसुणी ३० रुपये दराने विक्रीसाठी उपलब्ध केली असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

शिंदीच्या झाडांपासून केरसुणी बनवणे हे काम सोपे नाही. त्यासाठी प्रचंड मेहनत लागते, ते बनवण्यासाठी वेळ खर्ची घालावा लागतो. तरी त्याचे मोल कवडीमोल ठरवून मेहनतीचे पैसे देखील या झाडू साठी मोजताना लोक नाक मुरडतात. दिवाळीत केरसुणीचे लक्ष्मीपूजनाला घरोघरी पूजन केले जाते. त्यामुळे दिवाळीत त्याला विशेष मागणी असते.

## दिवाळीतील लक्ष्मी पूजनाच्या दिवशी केरसुणीला महत्त्व

मराठवाड्यात शिंदीची झाड शेताच्या बांधावर सहज उपलब्ध होतात. दुष्काळी भाग असल्याने वर्षात पिक दोन वेळा घेता येत. पिक विकून हाती येणारा पैसा कमी असल्याने जोड व्यवसाय म्हणून केरसुणी तयार करून जवळपासच्या गावात विक्री करण्यासाठी सुरुवात केली. कालांतराने नोकरी आणि व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मुंबईत १९९२ साली कुटुंबासहीत स्थलांतर झाले. गावात तयार करण्यात आलेल्या केरसुणींची विक्री मुंबई शहरात करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला.

केरसुणीची बांधणी अनेक प्रकारे करता येते. विविध प्रकारचे केरसुणी अतिशय स्वस्त दरांत उपलब्ध करण्यात येत असून या क्षेत्रात विविध खाजगी कंपन्यानी तसेच अनेक ठिकाणी प्लास्टिक झाडू उपलब्ध असल्याने आर्थिक नुकसान होत असून दिवाळी निमित्त वापरात येणारे केरसुणी मोठ्या प्रमाणात तयार करण्यात येतात. दिवाळी सणानिमित्त पारंपरिक पद्धतीने बांधण्यात आलेल्या झाडूला विशेष महत्त्व असल्याने दिवाळीनिमित्त ग्राहकांचा प्रतिसाद चांगला आहे.



## शिंदीच्या झाडाबद्दल....

खजुराच्या झाडासारखा दिसणारा एक वृक्ष. शिंदी हा वृक्ष ॲरेकेसी कुलातील असून त्याचे शास्त्रीय नाव फीनिक्स सिल्व्हेस्ट्रिस आहे. ताड, माड, सुपारी हे वृक्षदेखील याच कुलातील आहेत. शिंदी हा वृक्ष मूळचा भारतातील असून म्यानमार, श्रीलंका, नेपाळ, भूतान, बांगला देश या देशांतही तो आढळतो. भारतात हा वृक्ष समुद्रसपाटीपासून सु. १,५०० मी. उंचीपर्यंत आढळतो. बहुधा तो ओलसर गाळ असलेल्या जमिनीत, ओढ्यानाल्यांच्या काठी वाढलेला दिसून येतो. सर्वसाधारणपणे शिंदी वृक्षाची उंची १०-१५ मी. असते. खोडाचा घेर सु. ४० सेंमी. पर्यंत असू शकतो. शिंदीच्या वृक्षाला फांद्या क्वचितच दिसतात. गळून पडलेल्या पानांच्या देठांच्या वणांमुळे खोड खरबरीत दिसते. पाने संयुक्त, एकाआड एक, मोठी व ३-५ मी. लांब असतात. पानांचे देठ सु. १ मी. लांब असून त्यांवर काटे असतात. पानांचा उपयोग छपरे, चटया, हातपंखे, टोपल्या, पिशव्या, झाडू, केरसुण्या, मासे पकडण्याची जाळी इ. तयार करण्यासाठी होतो. देठ आणि मध्यशिरांचा उपयोग दोर बनवण्यासाठी करतात. खोड कठीण असून त्यापासून डिंक मिळतो


## ग्रुप ग्राम पंचायत तळवली, अर्जुनली
पोस्ट पडघा तालुका भिवंडी जिल्हा ठाणे


सौं निशा आनंद पाटील
(सरपंच )


सौं उषा संकेत कदम
(उपसरपंच )


श्री ज्ञानोबा राजू आंधळे
(ग्राम विकास अधिकारी)

सर्व नागरिकांना ही दिवाळी सुख, समृद्धी, भरभराटी आणि आनंदाची जावो ही सदिच्छा




:: सदस्य ::
श्री. महेश सुदाम राऊत
सौ. सना काशिक मुरूमकर
श्री रुफी अतिक मुकरी
सौ. सना मंजूर धांगे
सौ. नदीरा जुनैद रईस
श्री. अजय सुदाम चौहान
सौ. सारीका जगदीश राऊत
श्री. प्रकाश सुकऱ्या मुकणे

:: सामान्य प्रशासन ::
श्री तकी अतिक मुकरी
(वरिष्ठ लिपिक )
श्री शाहरुख मंजूर धांगे
(कनिष्ठ लिपिक)
सौं चैताली चंद्रकांत राऊत
(संगणक /परिचालक )

तमाम नागरिकांना विनंती करण्यात येते की;
सर्वांनी सर्व प्रकारचे ग्रामपंचायतीचे कर भरून गावचे विकास कामांना सर्वांनी हातभार लावावा ही विनंती


### काय मी वर्णु दिवाळी

लागले लाखो दिवेही,
जाळण्या काळोख सारा
धुंद तो आला सुगंध,
कुठुनसा घेऊन वारा

शोभतो आकाशकंदिल,
टांगला उंचावरी
टाकला दारी सडाही,
बांधले तोरण दारी

होई ते अभ्यंगस्नान,
लावुनी उटने सुगंधी
तप्त ते पाणी पहाटे,
चढविते न्यारीच धुंदी

रोषणाई हा खरोखर,
प्राण या दिपोत्सवाचा
शुभशकुनी सोनकिरणे,
नाश करिती दानवांचा

काय मी वर्णु दिवाळी,
सोहळा परमोच्च आहे
मानवाच्या संगतीने,
देवसुद्धा वाट पाहे

# काव्य दिवाळी

## कविता माझ्या मनातली...



### दीपावली अभिष्टचिंतन

दीप ज्योती
तम निवारती,
दीप आरासीने
सदन उजळती....

रेखीव रांगोळया
विविध रंग खुलवती,
आकाश कंदील
दारी शोभती....

प्रियजनांच्या
भेटीगाठी होती,
परिवार जमता
सदने बहरती....

फराळ पक्वान्ने
मिष्टान्न पंगती,
गप्पा गोष्टींच्या
मैफिलीत रंगती....

वसू बारसेस
पुजणे गोधन,
धनत्रयोदशीस
धन संपत्तीचे पूजन....

नरक चतुर्दशीस
मनअसुराचे हनन,
संपवून द्वेष क्लेश
स्नेहसंबंधांचे वर्धन....

दिपावलीस होते
तेजोदीपांचे पूजन,
बली प्रतिपदेस
नववर्षदिन....

भाऊबीजेस
बंधूचे आगमन,
भाळी गंधाक्षता
सुपारी दिपाने औक्षण....

दिवस सणांचे
जाती भुर्रकन,
उत्साह आनंदे
भारून जीवन....

सर्वांगीण समृद्धधीच्या
वर्धन संवर्धनासाठी,
प्रिय स्नेही गण गोतास
दीपावली प्रित्यर्थ अभिष्टचिंतन

अविनाश भालेराव, बदलापूर(पूर्व)
संवाद - ९८६७९६८३११ / ९७६९३९७४१४

---

### वेध दिवाळीचे

आली आली आली
दिवाळी आज आली
सण साजरा घरी
आनंदाने भारी

फराळाची तयारी
सुगंधाची झेप
उत्सवाची भरारी
घरो दारी माप

घराची रंग रंगोटी
लागे कपड्याची जाई
जणू सजली दुल्हन
अशी दिवाळीची घाई

खिडक्या दरवाजा
दिव्यांनी सजला
अंगणात रांगोळी
सडा टाकीला

आकाश कंदील
प्रकाशाचे मंगल
रोगराई जाईल
दुःख सारे हारेल

चिमुकल्यांचा आवाज
गजबजले घर
फटाक्याचा आवाज
विघ्न चा सिंगार

चार भिंती बोले
जणू नजरेने लाजले
सगे सोयरे आले
शुभ मंगल झाले

लहान थोर मोठे
भाऊबीज केली
प्रेमाची दिवाळी
आठवणीत राहीली

कवी - कलाध्यापक श्री संदीप ईश्वर पाटील
सर कल्याण देवगावकर ८८५७९६४१९४

---

### आठवणींचे व्याकुळ दिवे



रांगोळीतील हुकले ठिपके
रेषांमधील नाजूक वळणे,
तुळशीमाईचे लगीन लटके
परत दणक्यात लावशील का?

तीरकामठा रंगीत कागद
चिखलमाती अर्धा किल्ला....
शिवाजीच्या मावळ्यांहाती,
परत फराळ ठेवशील का?

किणकिण बांगड्या काचेच्या
घिरघीर झालरी पोरींच्या!
सुरसूर बत्त्या, चुटक्या टिकल्या
परत उडवण्या येशील का?

पहाट झोपेत हळूच उठवून
घमघमणारी आंघोळ घालून,
फुलबाजांची हजार फुले
परत हातात ठेवशील का?

तिथली दिवाळी धमाल मजा
इथली दिवाळी शांत सजा!!
आठवणींचे व्याकुळ दिवे
परत घरी पोचतील का?


# ग्रुप ग्रामपंचायत चाणे

पोस्ट - दिघाशी, तालुका - भिवंडी, जिल्हा - ठाणे



श्री नितीन शिवराम जाधव
( सरपंच )



श्री. भगवान बा. भरोसे
(ग्राम पंचायत अधिकारी)

श्री प्रदीप बाळू कासकर ( उपसरपंच )

सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

**सन्माननिय सदस्य**

सौ. निकिता नितीन जाधव
सौ. सुमंता शिवराम जाधव
सौं जिज्ञासा जितेंद्र पाटील
सौ. सायली सचिन भोईर
श्री. योगेश अंकुश गरासे
श्री. महेश रामचंद्र वळवी

**सामान्य प्रशासन**

श्री भगवान बा. भरोसे
(ग्राम पंचायत अधिकारी)
श्री बाळाराम कुशा भोईर
( शिपाई )

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की पाणीपट्टी, घरपट्टी, तसेच सर्व प्रकारचे कर वेळीच भरून विकास कामांना सहकार्य करावे ही विनंती.



॥ नातं विश्वासाचं स्वप्न विकासाचं ॥

# ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लिमिटेड, ठाणे-पालघर

कार्यक्षेत्र : ठाणे पालघर जिल्हा

(नोंदणी क्र. : टी.एन.ए./बी.एन.के./403 दि. 12/04/1979)
मुख्य कार्यालय : सुंदरा प्लाझा, सनई बँक्वेट इमारत, पहिला मजला, बैलबाजार, कल्याण (प.), जि. ठाणे. फोन : 7875553163

विद्यासेवकांची आर्थिक बाजू भक्कम करणारी जिल्ह्यातील नामवंत पतसंस्था

**पतसंस्थेची स्थिती, धोरणे व निर्णय :**

- कर्जाची कमाल मर्यादा ५० लाख, परतफेड हप्ते १८० महिने ( कर्जाची कमाल मर्यादा उत्पन्नाच्या प्रमाणात )
- आर्टिकल कर्ज व वैद्यकीय कर्ज रु. ३ लाखापर्यंत तात्काळ उपलब्ध
- ठेवींवर आकर्षक व्याज
- सतत "अ" ऑडिट वर्ग
- संस्थेची उलाढाल २५० कोटी
- कन्यादान व आहेरमान योजनेद्वारे पतसंस्थेच्या एका मुलीस/मुलास विवाह प्रित्यर्थ रु. ५५५५/- रकमेचा धनादेश
- कर्जावरील व्याज दर १०% EMI पध्दतीने
- फेस्टिव्हल कर्ज सणासाठी रु. ५० हजारांपर्यंत
- दामदुप्पट ठेव : ९० महिन्यात रक्कम दुप्पट
- आपत्तीग्रस्त व आजाराने पिडीत सभासदांना व कुटुबियांना कल्याण निधीतून यथोचित मदत
- सभासद संख्या ७००० पर्यंत
- साधारण व आर्टिकल कर्जासाठी स्वतंत्र कर्ज विम्याच्या योजना
- मृत्युफंड योजना - सभासदाच्या मृत्यु पश्चात त्याच्या वारसास रु. ५० हजार मर्यादेपर्यंतची आर्थिक मदत ( प्रायोगिक तत्वावर सुरु, अटी व शर्थी लागू )

- प्रेरणास्थान -



माजी आमदार स्व. श्री. रामनाथ मोते
माजी सल्लागार



माजी आमदार स्व. श्री. वसंतराव बापट
संस्थापक



मान. श्री. जयंतराव ओक
संस्थापक कार्यवाह/सल्लागार

**संचालक मंडळ सन 2022-23 ते 2026 -27**

श्री.सुधीर देवराम घागस
अध्यक्ष

श्री.धनाजी तुकाराम दळवी — उपाध्यक्ष | श्री.दुर्जन नामदेव भोईर — कोषाध्यक्ष | सौ. सायली रमेश बुटेरे — कार्यवाह

श्री. प्रशांत तुकाराम भामरे (माजी उपाध्यक्ष)
श्री. संदिप विठ्ठल कालेकर
श्री. संदेश धर्मा पाटील
सौ. संगिता प्रकाश पाखले
श्री. शैलेश नाना भोईर
श्री. सुरेश अण्णा सापळे (माजी उपाध्यक्ष)
श्री. गजानन श्रीराम पाटील
श्री. दिगंबर रमेश बेंडाळे
श्री. राजेंद्र यादवराव गवळी
श्री. किशोर हेमराज राठोड
श्री. थॉमसकिशोर जोसेफ शिनगारे
श्री. अनंत रुपचंद कान्हेरकर (व्यवस्थापक तथा कार्यलक्षी संचालक)
श्रीम. दिपाली सचिन माहे (उपव्यवस्थापिका )
श्री. समीर सुभाष राजे (हिशेबनीस)



संस्थेचा विस्तार ठाणे व पालघर जिल्ह्यात ८ शाखांद्वारे चालू

श्री.सुधीर देवराम घागस अध्यक्ष



# ग्रुप ग्रामपंचायत कुरुंद

मु. कुरुंद, पो. पडघा, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे



सौ. दिपाली दिलीप केदार
सरपंच



सौ. विशाखा विश्वनाथ भोईर
उपसरपंच



श्री नितीन परशराम देशमुख
ग्रामविकास अधिकारी

**सन्माननिय सदस्य**

श्री श्रीकांत रामचंद्र गायकर
सौं निकिता मुकेश जाधव
श्री भाई हरिभाऊ पाटील
सौं जान्हवी जगदीश पाटील
कुमारी रेश्मा गणेश वाघे
श्री योगेश भगवान पाटील
श्री सुनील रामचंद्र मोरे
श्री संदीप जगन्नाथ काठोळे
सौं भावना भगवान सांबरे

**सामान्य प्रशासन**

श्री.नितीन परशराम देशमुख
(ग्राम विकास अधिकारी)
सौ.शितल विकास पाटील
(लिपिक)
श्री.रवींद्र विठ्ठल घोडविंदे
(दिवाबत्ती / सहाय्यक लिपिक)
श्री पंकज शनिवार जाधव
(वसुली लिपिक )

सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की पाणीपट्टी, घरपट्टी, तसेच सर्व प्रकारचे कर वेळीच भरून विकास कामांना सहकार्य करावे ही विनंती.




# काटेरी चकलीचे मृदुपण

'आमच्या आईची चकली जशी आमच्या लहानपणी आम्ही खाल्ली आहे, तशीच आजही होते!' आमचे एक जेष्ठ स्नेही सांगत होते. ७८ वर्षाच्या आजीही कौतुकभरल्या हसऱ्या चेहऱ्याने 'लेक सांगतोय ते बरोबर आहे!' असं सांगत अभिमानाने मान डोलवत होत्या. एक-दोन जणांनी 'अरे व्वा.. येऊ आम्ही दिवाळीत चकली खायला' असं जाहीर केलं. काही दिखाऊ हौशी सुगरणींनी 'प्रमाण काय घेता भाजणीला? मी करेन तुमच्याप्रमाणाने' असं विचारून घेतल! आजींनी प्रमाण सांगितल्यावर काहींनी 'यात काय वेगळं आहे?' असा भाव जाहीर धारण केला. काहींनी मात्र 'हरभरा डाळीऐवजी फुटाण्याच डाळं घातलं की हलक्या होतात' असंही ज्ञान दिलं. एकूण जमलेल्या सर्वांकडे चांगल्या चकल्यांची स्वतःची अशी हमखास रेसिपी होती. मी आणि माझ्यासारख्या एक-दोनजणींची चकली कोंडी फोडत मी कबुलीजबाब दिला.. 'माझी चकली-लॉटरी चकली असते.' 'म्हणजे?' अनेकांनी एकदम विचारलं..आणि मी आठवायला लागले. खरंच माझी चकली 'हमखास यशस्वी!' अशी होत नाही.

माझ्या लहानपणी आईला 'मदत' करायला आम्ही जी काही लुडबुड करायचो तेंव्हा मोहन घालणे, आधण/ओतवणी घालणे, सोऱ्या असे नेहमी न वापरले जाणारे शब्द कानावर यायचे. घरात बरेचसे पदार्थ होत असताना 'चकली'च्या दिवशी मात्र 'घाट घातला' वाटावं अशी अनेक वस्तूंची गर्दी स्वयंपाकघरात दिसायची. तळणीचा खमंग वास घराघरातून येताना, बाहेर खेळून दमलेल्या आमच्या बालजीवांच्या पोटी भूक जन्म घ्यायची. पण ते सगळे पदार्थ 'नैवेद्य व्हायचाय!' एवढ्या एका वाक्यावर डब्यात भरले जायचे. घरोघरी चकली तळणीत पडेपर्यंत अन् नंतर तळून झाल्यावर 'ती मऊ पडणार का कुरकुरीत रहाणार' यावर चर्चा व्हायची. कधी कुणाची चकली तेलकट तर कधी कटकटीत असायची. कधीतरी दिसायला 'देखणी' पण चवीला 'चकणी' असायची. प्रत्येकीची भाजणी-मळणी- तळणी याची तंत्रं निराळी असायची. तेव्हापासूनच कदाचित ह्या चकलीनं माझ्या बालमनावर स्वतःच्या काटेरी खुणा ठेवल्या असाव्यात. माझी मी चकली करायची ठरवली आणि माझ्यासाठी पहिली 'हमखास रेसिपी' मैत्रीणीकडून आली. तोंडी माहिती बदलू शकते म्हणून ती लिखीत स्वरुपातही घेतली. चकली बरी झाली पण तिच्या वर्णनाइतकी 'भारी' काही झाली नाही. हमखास रेसिपी सखीला विचारलं तर म्हणाली 'माझी छान झालीय.. तु मळलं कमी असशील'. भाजणी प्रमाण लिखीत होतं, कृती तोंडी होती. त्यामुळे मी गप्प! पुढील वर्षी 'नवा राजा, नवा राज' या न्यायाने जुनी मैत्रीण नवीन हमखास रेसिपी घेऊन आली. या वर्षी मागील चुकांची पुनरावृत्ती न होण्याचे भान फक्त मला सांभाळायचे होते. ही भाजणी व भरपूर मळणी असा क्रम नक्की झाला. चकली करायच्या दिवशी दोन्ही वेळचा स्वयंपाक करून ह्या कामी लागायचं आणि चकली 'जमवायची' अस ठरवलं. काम सुरू केल. तळल्याबरोबर चकली खाऊन पाहिली.चकली मऊ वाटली. मैत्रीणीला फोन केला तर म्हणाली.. 'गार झाल्यावर बघ, मस्त कुरकुरीत होणार..गरम असताना मऊच वाटते!'

अंधविश्वास का काय तो ठेऊन चकली काम पूर्ण केलं. गार झाल्यावर डब्यात ठेवतानाही 'चकली बाई' मऊसुतच राहिल्या आहेत अस वाटलं. पण विश्वास होता ना मैत्रीणीवर म्हटलं.. दगाफटका नाही होणार! प्रत्यक्षात मात्र दिवाळी संपली - चकली संपत आली पण अंगी बाणलेले मृदुपण चकलीने सोडले नाही, थंड काय थंडी संपल्यावरही मृदुपण चकलीकडे अबाधित राहिले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी


दिवाली खुशियोंवाली
स्वदेसी
दिवाली मिठाईयोंवाली
शुभ दीपावली
अनंत हलवाई एक अपुर्वाई
अनंत हलवाई ®
स्थापना १९१४
दिवाळी निमित्त
प्रीमीयम
मिक्स मिठाई व
ड्रायफ्रूट
डिझायनर बॉक्सेस
आणि
पारंपारिक फराळ
अनेक प्रकारच्या कतली
मामरा बदाम कतली
अक्रोड कतली
जरदाळू कतली
पिस्ता कतली
खारीक कतली
काजू कतली
अंजीर कतली
सर्व मिठाई दर्जेदार ड्रायफ्रुट व शुद्ध देशी तूपात बनवली जाते
BPPL
१११ वर्षांची गोडपरंपरा
for bulk & corporate orders, please contact : 9146538083
कल्याण (पश्चिम)
टिळक चौक - ९३७२२६६९१८ | स्टेशन रोड - ९१४६५३८०८३
illustrative images
खडकपाडा - ९००४२४२१४७ | गांधी चौक - ७३०४७७३०९७ | रामबाग - ८५९१०७०७३१
अधिकृत विक्रेते
डोंबिवली (प.) | माणकोली नाका, अंजुर रोड | कोनगाव | टिटवाळा (पू.) | अंबिवली | गांधारे, कल्याण
शिवाजी चौक, भिंवडी | बेलवली, बदलापूर | कल्याण (पू.) | कर्जत (प.) | बदलापूर (पू) | पडघा | खोणी, पलावा